# ई - पोलीस पत्रिका

दि. २८/०८/२०२४ अनु.क्र.१५६

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## प्रशिक्षण

**१.पोआअ/पशा-१/MIA/VIP/Sec/७४२५/२०२४ अमरावती शहर दिनांक १६/०८/२०२४**

**संदर्भ :-** विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे यांचे बिनतारी संदेश O. NO. MIA /TRG/JULY/VIP SECURITY COURSE NO.१८/२०२४/३७४६ दि. २२.०७.२०२४

**विषय :-** महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे आयोजित VIP SECURITY Course No. १८/२०२४ या प्रशिक्षणासाठीपोलीस अधिकारी पाठविणे बाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे **VIP SECURITY Course** या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन केलेले आहे. अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद पोलीस अधिकारी यांची सदरचे प्रशिक्षणा करीता निवड करण्यात येत आहे.

| प्रशिक्षणकेंद्राचे नाव | प्रशिक्षण दिनांक | अधिका-याचे नांवे | नेमणुक |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे | १९.०८.२०२४ ते २३.०८.२०२४ | श्री. सुरेंद्र पाटील पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. बडनेरा, अमरावती शहर |

उपरोक्त प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण शुल्क प्रत्येकी रु. ७५००/- आकारण्यात आलेला आहे. सदर प्रशिक्षण शुल्क प्रशिक्षण निधी मधुन मंजुरकरण्यात येत आहे. परंतू प्रशिक्षण निधी शिल्लक नसल्यानेसदर प्रशिक्षण शुल्कहे प्रशिक्षण अनुदान प्राप्त होताच संबंधीत प्रशिक्षणकेंद्रास अदाकरण्यात येईल.

प्रशिक्षणकेंद्रात जाण्यापुर्वी त्याबाबतचे नियम व अटीखालील प्रमाणे :-

१. उपरोक्त पोलीस अधिकारी यांनी UNIFORM, I-CARD, SPORTS DRESS, SPORT SHOES, RELIEVING MEMO इत्यादीसाहित्य सोबत नेणे आवश्यक आहे.

२. उशिरा पोहचणा-या अधिका-यांना प्रशिक्षणास ॲडमिशन मिळणार नाही व त्यांना परतकरण्यात येईल. तसेच प्रशिक्षणा दरम्यान कोणतेही रजा किंवा परवानगी मिळणार नाही.

३. उपरोक्त प्रशिक्षणार्थींनी वैद्यकीय आपतकालीन परिस्थितीकरीता महाराष्ट्र कुटूंब कल्याण आरोग्य योजना कार्ड सोबत नेणे आवश्यक आहे.

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/अ.र.रोखीकरण/७३९८/२०२४ अमरावती शहर दिनांक १४/०८/२०२४**

# आदेश

शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन-२०२३/प्र.क्र.१३/सेवा-३, दि नांक २८.०६.२०२३ अन्वये दिनांक ३० जुन रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणा-या पोलीस अंमलदारांना लगतच्या ०१ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तीवेतन निश्चिती करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाच्या आस्थापनेवरील दिनांक ३० जुन रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या खालील नमूद पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे दिनांक लगतच्या ०१ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ मंजुर करण्यात आली आहे.त्यांना दिनांक १जुलै रोजी मंजूर केलेल्या वेतनवाढीनुसार वित्त विभाग निर्णय क्र.अरजा/१९२०/प्र.क्र-१२/सेवा-६,दिनोक२४/०५/२०१९ अन्वये मधील तरतुदीप्रमाणे एकुण शिल्लक अर्जित रजेनुसार रोखीकरणाच्या रकमेचे फरकाची रक्कम अदा करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | मॅट्रीक्सचे वेतन |
|---|---|---|
| **सहायक पोलीस उपनिरीक्षक** | **एस-१०** | **रु २९२०० - ९२३००** |
| **पोलीस हवालदार** | **एस-९** | **रु २६४०० - ८३६००** |
| **पोलीस नाईक** | **एस-८** | **रु २५५०० - ८११००** |

| अ. क्र. | पदनाम | बक्कल क्रमांक | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त पोलीस अंमलदाराचे नाव | सेवानिवृत्तीचा दिनांक | दि.३० जुन रोजी रोजीचे वेतन व ग्रेट पे | दि.०१ जुलै रोजीचे काल्पनिक देय मुळ वेतन व ग्रेड पे | दि.०१ जुलै रोजीचे काल्पनिक एकुण देय वेतन | अखेरची शिल्लक अर्जित रजा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पोहवा | ७२८ | मधुकर किसनराव खंडारे | ३०.०६.२०१८ | ४११००/- | ४२३००/- | ४२३००/- | २६१ |
| २ | पोहवा | ९५१ | राजेंद्र पंजाब शेंडे | ३०.०६.२०२१ | ४३६००/- | ४४९००/- | ४४९००/- | ३०० |
| ३ | सपोउपनि | ५४० | मदन शामा राठोड | ३०.०६.२०१७ | ४१६००/- | ४२८००/- | ४२८००/- | ३०० |

सदरचा खर्च @ PENSION OF OTHER RETIRMENT BENEFITS २०७१०५९८-११५ ENCASHMENT BENEFITS लेखा शिर्षातुन भागविण्यात यावा.

**२.पोआअ/आस्था-५/प्रसुती रजा/७६४८/२०२४ अमरावती शहर दिनांक २३/०८/२०२४**

# आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ तसेच वित्त विभाग, शासन

निर्णय क्रमांक अरजा-१४०९/प्र.क्रं.८/०९/सेवा-६, दिनांक २४/८/२००९ व दि.१५/१/२०१६ चे तरतुदीनुसार १८० दिवस प्रसुती रजा, रजा वेतनासह प्रसुतीच्या संभाव्य तारखेपासुन अथवा प्रसुतीकरीता रजेवर सुटल्याचे तारखेपासुन मंजुर करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम/ब.नं./ नाव** | **नेमणुक** | **नियुक्ती दिनांक** | **प्रसुतीची वेळ** | **प्रसुतीची संभाव्य तारीख** | **अपत्यांची संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/१४६९, किर्ती येडे (राणा) | शवाशा पश्चिम | दि.०१/०२/२००१ | दुसरी | दि.२९/०९/२०२४ | १ |

वरिल नमुद महिला पोलीस अंमलदार यांना रजेवर सोडल्याचा व हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

### शिक्षा

**१.पोआअ/प्रलि-विचौ/रे.या.सुधिर सोनटक्के/कोर्ट आदेश/७६१५/२०२४ अमरावती शहर दिनांक २३/०८/२०२४**

संदर्भ :- पोलीस अधीक्षक, अकोला यांचे पत्र क्र. पोअअ/विचौ/२५-क/रे.यां.सुधीरसोनटक्के/ कोर्टआदेश/ ४६५७/२०२४, दिनांक १२/०४/२०२४

विषय :- मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण नागपुरखंडपीठ नागपुर यांचेकडील मुळअर्ज क्र. १२३/२०१९ च्या न्याय निर्णय दिनांक ०७/१२/२०२३ नुसार पोनि-दळणवळण मा.तं.व. परिवहन अमरावती शहर यांचे मार्फत एएसआय/रेडिओ यांत्रिक- सुधिर पांडुरंग सोनटक्के यांनी केलेला विनंती अर्ज.

--००--

उपरोक्त सदर्भांकित विषयाचे आदेशान्वये,सपोउपनि/रेडिओ यांत्रिक श्री.सुधिर पांडुरंग सोनटक्के, नेमणुक दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग, अमरावती शहर यांचा दिनांक २४/०३/२०१५ ते १५/१०/२०१५ पावेतो २०६ दिवस गैरहजर कालावधी हा वैद्यकीय रजा म्हणुन मंजूर करण्यांत आला आहे. सदर आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. सदर कालावधीतील त्यांना अनुज्ञेय असणारी वेतनाची थकबाकी पोलीस अधीक्षक, अकोला यांचे आदेश क्र. पोअअ/विचौ/२५-क/रे.यां.सुधीर सोनटक्के/कोर्ट आदेश/४६५७/२०२४, दिनांक १२/०४/२०२४ अन्वये, त्यांचे वेतनात रोखीने अदाकरण्यांत यावी.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

# <u>वेतन निश्चितीती</u>

**१.पोआअ/आस्था-वेनिलि/प्रतिनियुक्ती हजर पदो./वे.नि./७७१२/२०२४, अमरावती दिनांक :-**

## <u>आदेश</u>

**मपोहवा/१४० वैशाली मिलींद फुले, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर** यांना या कार्यालयाचे आदेशक्र.पोआअ/आस्था-प्रलि/पोनाते पोहवा पदोन्नती/१०५३८/२०२३ दिनांक १८.०९.२०२३ अन्वये पोलीस नाईक या पदावरुन पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती देण्यात आली परंतूसदर कालावधीत ते पोलीस प्रशिक्षणकेंद्र, नागपुर येथे प्रतिनियुक्तीवर हजर असल्यानेत्यांची पोहवा या पदोन्नतीच्या पदाची वेतननिचितीकरण्यात आली नाहीतसेचत्यांचे सेवापट उशिरा प्राप्त झाल्याने त्यांना माहे जुलै-२०२४ ची नियमीत वेतनवाढ अदाकरण्यात आली नाही.

**मपोहवा/१४०, वैशाली मिलींद फुले,** यांचे सेवापट प्राप्त झाल्यानेत्यांचीमहाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११ (१) (अ) तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम २०१९ मधील नियम १३ अन्वये सातव्या वेतन आयोगानुसार पदोन्नतीच्या पदाची वेतन निश्चितीकरण्यात येत आहे.

| **वेतनवाढीचा दिनांक** | **विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन** | **वेतनवाढीचा दिनांक** | **सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतन** |
|---|---|---|---|
| ०१.०७.२०२३ | रु.३९८००/- एस-८ | ०१.०७.२०२३ | रु.३९८००/- एस-८ |
| | | १८/०९/२०२३ | रु.४१०००/- एस-८<br>पोलीस हवालदार पदावर पदोन्नती झाल्याने विद्यमान पदावर मानीव वेतनवाढ<br><br>नियम ११ (१)(अ) नुसार पदोन्नतीच्या (पोहवा) पदाची वेतननिश्चिती.<br>रु.४११००/- एस-९ |
| ०१/०७/२०२४ | -- | ०१/०७/२०२४ | रु.४२३००/- एस-९ |

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या सुधारीत वेतनिश्चितीमुळे अनुज्ञेय असणारी थकबाकी वेतनात रोखीन अदाकरण्यात यावी. तसेच सदरची वेतन निश्चितीही वेतन पडताळणी पथक यांचे अतिम तपासणीचे अधीन राहून करण्यात आली असून भविष्यात रकमेचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिप्रदानाची रक्कम त्यांचे कडून वसूल करण्यात येईल.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस